मानसन्मान

# ‘हनी माईंडेड’ उद्यमशीलतेचा यथार्थ गौरव

# मधमाश्यांनी मिळवून दिला जागतिक पातळीवरचा पुरस्कार



डॉ. बी.बी. पवार
(मो.नं. ९९२२४१०८७५ )
संस्थापक संपादक: ‘पूर्वा कृषिदूत’

- ‘बसवंत’च्या पर्यटकांना मधमाशीनं सृष्टिसंवर्धनाची लावली गोडी
- अल्पावधीतच या केंद्राची वैशिष्ट्यपूर्ण रचना झाली सर्वतोमुखी
- तीन वर्षांपासून आयोजिला जातो राज्यस्तरीय ‘मधुक्रांती’ परिसंवाद
- बहुरंगी फलक आणि चित्र-शिल्पांमधून मधमाशीच करते हितगुज
- मधु- व्यवसायाबद्दल सारं काही एकाच हिरव्या मांडवाखाली



‘वर्ल्ड ट्रॅव्हल मार्केट’चे सल्लागार व ‘इंटरनॅशनल सेंटर फॉर रिस्पॉन्सिबल टुरिझम’चे अध्यक्ष हॅरॉल्ड गुडवीन आणि मध्य प्रदेशच्या पर्यटनमंत्री उषा ठाकूर यांच्या हस्ते ‘रिस्पॉन्सिबल टुरिझम अॅवॉर्ड’ हा पुरस्कार स्वीकारताना ‘ग्रीनझोन अॅग्रोकेम’चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार.

आमच्या पिंपळगाव बसवंत (ता. निफाड, जि. नाशिक) येथील **'बसवंत हनी बी पार्क'ला जागतिक स्तरावर कार्यरत असलेल्या 'वर्ल्ड टुरिझम मार्केट' या संस्थेतर्फे 'रिस्पॉन्सिबल टुरिझम'साठी देण्यात येणारा 'वर्ल्ड ट्रॅव्हल मार्केट– रिस्पॉन्सिबल टुरिझम अ‍ॅवॉर्ड' हा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.** 'नैसर्गिक वारसा आणि जैवविविधतेमध्ये पर्यटनाचे योगदान वाढविणे' या श्रेणीमध्ये 'बसवंत हनी बी पार्क'ला रौप्यपदकाने सन्मानित करण्यात आले. मध्य प्रदेश टुरिझमला सुवर्णपदक मिळाले. भोपाळ येथे दि. ७ सप्टेंबर रोजी झालेल्या दिमाखदार सोहळ्यात वर्ल्ड ट्रॅव्हल मार्केटचे सल्लागार व इंटरनॅशनल सेंटर फॉर रिस्पॉन्सिबल टुरिझमचे अध्यक्ष हॅरॉल्ड गुडवीन आणि मध्य प्रदेशच्या पर्यटनमंत्री उषा ठाकूर यांच्या हस्ते **'ग्रीनझोन अ‍ॅग्रोकेम'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांनी हा पुरस्कार स्वीकारला.**

### 'पूर्वा केमटेक' ते 'ग्रीनझोन अ‍ॅग्रोकेम'

श्री. संजय पवार यांनी केमिकल इंजिनीअरिंग या विषयात पदवी घेतली आहे. सन १९९४ मध्ये त्यांनी पिंपळगाव बसवंत येथे 'पूर्वा केमटेक' या कंपनीची स्थापना केली. यथावकाश ही कंपनी चांगली नावारुपाला आली. आपल्या दर्जेदार उत्पादनांच्या जोरावर कंपनीने आपली कक्षा वाढवायला सुरवात केली. सध्या ही कंपनी राज्याबाहेर गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड व कर्नाटक या राज्यांत कार्यरत आहे. या कंपनीच्या जोडीला त्यांनी सन २०१० मध्ये 'ग्रीनझोन अ‍ॅग्रोकेम' या कंपनीची स्थापना केली. या कंपनीने नाशिक जिल्ह्यातील प्रमुख नगदी पीक असलेल्या द्राक्ष पिकाकडे लक्ष केंद्रित केलं. द्राक्षाच्या बेदाण्यानं त्यांचं लक्ष वेधून घेतलं. या बेदाण्याचं त्यांनी चांगलं ब्रॅण्डिंग केलं. त्याचं 'बसवंत बेदाणा' असं नामकरण केलं. बेदाण्याचे हिरवा, पिवळा, काळा, लाल, जम्बो असे विविध प्रकार आहेत. त्याचप्रमाणे बी असलेला काळा मनुकाही आहे. बसवंत बेदाण्याला भारतातील विविध ठिकाणांहून मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. अ‍ॅमेझॉनतर्फे त्याची विक्री होते. द्राक्षानंतर त्यांनी टोमॅटो व पेरू या दोन उत्पादनांकडे लक्ष केंद्रित केले. टोमॅटो हे या भागातील द्राक्षानंतरचे दुसरे महत्त्वाचे पीक आहे. टोमॅटोपासून 'बसवंत केचअप' बनवण्यास सुरुवात केली. त्याच्या जोडीला पेरूचा रस व विविध जॅम तयार करण्यास सुरवात केली. ही सर्व उत्पादने ग्राहकांच्या पसंतीस उतरली. सोबत मधाचे प्रोसेसिंगही सुरू केले. कृषिमालाची प्रक्रिया किती महत्त्वाची आहे हे शेतकऱ्यांना त्यांनी सोदाहरण दाखवून दिले.

### मधमाशीच्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यशैलीने आकर्षित केले...

पूर्वा केमटेकने गेल्या २५ वर्षांत समाधानकारक प्रगती केली. खेड्यातील शेतकऱ्यांच्या जवळपास ५०० मुलांना कंपनीने रोजगार उपलब्ध करून दिला. अर्धवट शिक्षण सोडलेल्या गावातील मुलांसाठी ही मोठी पर्वणी ठरली. कंपनीचा विकास होत असतानाच मधमाशीने श्री. संजय पवार यांचं लक्ष वेधून घेतलं. अल्बर्ट आईन्स्टाईन हे गेल्या शतकातील प्रख्यात जर्मन भौतिकशास्त्रज्ञ होते. मधमाशीचं निरीक्षण करून त्यांनी पुढील विधान केलं होतं– ''भूतलावरून मधमाशी नष्ट झाली तर अवघ्या चार वर्षांत मानवजात नष्ट होईल.'' यातून पिकांच्या परागीभवनातील मधमाशीचं महत्त्व अधोरेखित होतं. त्याचप्रमाणे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी इस्रोमध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी केली. ते भारताचे ११ वे राष्ट्रपती होते. तेही म्हणाले होते– ''आपल्या कामामध्ये मधासारखे परिणाम हवे असतील तर मधमाशीसारखं वागा.''

मध हा आरोग्यदायी, पौष्टिक व गोड पदार्थ आहे. मधमाशी हा अतिशय उद्यमशील, शिस्तप्रिय, सामूहिक सहजीवन जगणारा व परोपकारी कीटक आहे. श्री. संजय पवार यांना हे प्रकर्षानं जाणवलं. मधमाशीकडे हा अभियंता आकर्षिला गेला. मधमाशीचं शेतीमधील महत्त्व त्यांच्या लक्षात आलं. (खरे तर आमच्यासारख्या कृषी पदवीधरांनासुद्धा मधमाशी हा शब्द वर्गात कधी ऐकायला मिळाला नाही, मात्र सुदैवाने अलीकडे परिस्थिती बदलली आहे.)

मधमाशीबद्दल शास्त्रशुद्ध माहिती घेण्यास त्यांनी सन २०१८ मध्ये सुरवात केली. नाशिक येथील डॉ. तुकाराम निकम यांच्या ॲपिअरीला त्यांनी प्रथम भेट दिली. डॉ. निकम यांनी त्यांना चांगले मार्गदर्शन केले. त्यानंतर आपल्या दोन सहकाऱ्यांना बरोबर घेऊन त्यांनी पुणे येथील केंद्रीय मधमाशी संशोधन व प्रशिक्षण संस्थेत (सीबीआरटीआय) पाच दिवसांचे प्रशिक्षण घेतले. उत्तर भारतात काही ठिकाणी भेटी दिल्या. हिमाचल प्रदेशातील सोलन येथील डॉ. परमार युनिव्हर्सिटी ऑफ हॉर्टिकल्चर अ‍ॅण्ड फॉरेस्ट्रीमधील डॉ. मदन शर्मा यांचेही मार्गदर्शन घेतले. मधमाशीवरील इंग्रजीतील मोठमोठी पुस्तकं खरेदी करून अभ्यास केला. त्यानंतर त्यांनी सन २०१९ मध्ये पिंपळगाव बसवंत येथे 'बसवंत हनी बी पार्क व प्रशिक्षण केंद्रा'ची स्थापना केली.

### ‘बसवंत हनी बी पार्क व प्रशिक्षण केंद्र’

मधमाशीबद्दल सखोल ज्ञान घेतल्यावर त्यांनी व्यवसायात स्थिरावलेल्या ‘पूर्वा केमटेक’च्या जोडीने, नव्याने उभारलेल्या ‘बसवंत हनी बी पार्क’कडेही लक्ष केंद्रित केले. स्वत:च्या पावणेदोन एकर जमिनीवर हनी बी पार्क तयार करण्याचे त्यांनी ठरवले. या शेतात आंबे, सीताफळ, जांभूळ व शेवग्याची लागवड होतीच. मधमाश्यांना वर्षभर फुलोरा उपलब्ध व्हावा म्हणून त्यांनी नव्याने आवळ्याची व शेवग्याची लागवड केली. त्यानंतर त्यांनी इटालियन (मेलिफेरा) व सातेरी मधमाश्यांच्या प्रत्येकी दोन वसाहती आणल्या. कोया (ट्रायगोना) मधमाश्यांची एक व फुलोरी मधमाश्यांची एक वसाहत ठेवली. फुलोरी माशी अंधारात पाळता येत नाही. ती उजेडातच पोळे बांधते. तथापि एका बांबूच्या पाटीमध्ये तिची एक वसाहत ठेवण्यात आली आहे. सध्या बागेतील झाडांवर या प्रकारच्या मधमाश्यांनी ६-७ वसाहती तयार केल्या आहेत. आग्या माश्या या उंच झाडांवर, उंच इमारतींवर किंवा डोंगराच्या कडे-कपारीत पोळे बांधतात. परंतु या पार्कमध्ये एकदा या मधमाश्यांनी ५-६ फूट उंचीवरच वसाहत केली होती. ही जात अतिशय रागीट असते. त्यांना कुणी त्रास दिला तर त्या भयानक हल्ला चढवतात. कधी कधी माणसाचा मृत्यूही होऊ शकतो. पार्कमध्ये भेट देणाऱ्या लोकांना त्रास होऊ नये म्हणून ही वसाहत काढून लांब सोडण्यात आली. श्री. नितीन कराळे (एम.एस्सी. ॲग्री.) व श्री. गौरव पवार (बी.एस्सी.) हे वसाहतींची देखभाल करतात. आता त्यांनी ३-४ महिलांनाही वसाहती हाताळण्याचे प्रशिक्षण दिले आहे. श्री. कराळे यांच्या मदतीने मधमाशीबद्दल माहिती जमा केली. मधमाश्यांच्या प्राचीन इतिहासापासून आजपर्यंत झालेल्या संशोधनाचा आढावा घेण्यात आला. त्या माहितीचे फ्लेक्स तयार करण्यात आले. शेताच्या दोन कडेने दोन टनेल्स तयार करण्यात आले. त्यात काही चित्रे व ही माहिती आकर्षक रीतीने मांडण्यात आली. ही माहिती मराठीप्रमाणेच इंग्रजीमध्येही देण्यात आली कारण आजकाल बरीच मुलं इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेतात. मधमाशीपासून मिळणाऱ्या मध, मेण, परागकण, प्रोपोलिस, विष, रॉयल जेली या उत्पादनांचीही माहिती या टनेल्समध्ये लावण्यात आली आहे. परागीभवनात मधमाशीचं महत्त्व सांगणारी माहितीही येथे दिलेली आहे. मधमाशीबद्दलची जवळपास ९०% माहिती या टनेल्समधून भेट देणाऱ्या लोकांना मिळते.

या बागेत सूर्यफूल, मोहरी, बाजरी, मका, कोथिंबीर या मधमाशीप्रिय झाडांची वेळोवेळी थोड्या प्रमाणात लागवड करण्यात येते. आईस्क्रिम वेल व कृष्णकमळ यांचीही भरपूर लागवड केलेली आहे.

पहिला टनेल जेथे संपतो व दुसरा टनेल जेथे सुरू होतो, त्या ठिकाणी एक झोपडी बांधलेली आहे. या झोपडीत मधमाशी पालनासाठी लागणाऱ्या साहित्याची मांडणी करण्यात आली आहे. मधमाशी पालनाचे प्रशिक्षणार्थी व केंद्राला भेट देणाऱ्या व्यक्तींना या साहित्याची माहिती देण्यात येते. दोन्हीही टनेल्सना भेट देणाऱ्यांना महिला माहिती देतात. दुसरा टनेल संपल्यावर ॲपिअरीला भेट दिली जाते. येथे मधमाश्या हाताळता येतात. शेजारीच ‘मधमाश्यांचे गाव’ हे मॉडेल तयार करण्यात आले आहे. तेथून थोडे पुढे गेल्यावर शहरी मधमाशी पालनाचे मॉडेल उभारण्यात आले आहे. त्यानंतर बांबू व दगडावर पेंटिंग करण्यासाठी खास कक्ष तयार केले आहेत. कागदावरही पेंटिंग करता येते. येथे येणारे कुणीही पेंटिंग करू शकतात. लहान मुलांसाठी खेळ आहेत, झोके आहेत. आकर्षक सेल्फी पॉईंट आहे.

### सुसज्ज प्रशिक्षण केंद्र आणि संग्रहालय

पार्क पाहून झाल्यावर येणाऱ्या लोकांना प्रशस्त अशा प्रशिक्षण हॉलमध्ये मधमाशीवरील मूव्ही दाखवण्यात येतो. हॉलच्या तीन बाजूंनी बाहेरून एक संग्रहालय मांडण्यात आले आहे. त्यात ग्रामीण भागात होणाऱ्या बोहाड्यातील मुखवटे ठेवलेले आहेत. तसेच विविध प्रकारच्या मधाचे प्रकार व उपपदार्थ मांडण्यात आले आहेत. बांबूपासून बनवलेल्या वस्तूही येथे आहेत. हॉलच्या मागेच कॅफेटोरिया आहे. येथे चहा- कॉफी, नाश्ता, आईस्क्रिम मिळू शकते. त्याचप्रमाणे बेदाण्याचे व मधाचे विविध प्रकार तसेच बसवंत उद्यानात तयार होणारे टोमॅटो केचअप, जॅम व रस उपलब्ध आहेत. शेवटी फूडकोर्ट आहे. त्यात नाश्ता व जेवण योग्य दरात उपलब्ध करून दिले जातात.

### शेतकऱ्यांसाठी परागीभवन सेवा

साधारणपणे ६०-७० वर्षांपूर्वी जंगलतोड फारशी झाली नव्हती. ओढे- नाल्यांतून वर्षातील बरेच महिने पाणी वाहत असायचे. त्यांच्या काठावर अनेक मोठे वृक्ष व काटेरी झाडं-झुडुपं वाढलेली असायची. शेतीचे बांध मोठे असायचे. त्यांच्यावरही अनेक झाडं-झुडुपं वाढलेली असायची. या झाडा-झुडुपांमध्ये सातेरी व फुलोरी मधमाश्यांची अनेक पोळी आढळत. झाडांच्या पोकळ खोडांमध्ये ट्रायगोना (कोया) मधमाश्यांची पोळी आढळत. उंच झाडं, इमारती व डोंगरांच्या कडेकपारीत आग्या माश्यांची मोठमोठी पोळी आढळत. या सर्व प्रकारच्या मधमाश्या डोंगरावरील झाडे व

वेलींचे आणि शेतातील पिकांचे परागीभवन शेतकऱ्यांच्या नकळत करीत असत. पुढे सन १९६५ ते १९७१ च्या दरम्यान देशात हरितक्रांती घडून आली. त्यानंतर शेतांमध्ये रासायनिक खते, संकरित जाती व पेस्टिसाईड्सचा अविवेकी वापर वाढला. तसेच डोंगर टेकड्यांवरील झाडं-झुडपं तोडण्यात आली. ती उघडीबोडकी झाली. बांध लहान झाले. त्यावरील झाडं-झुडुपंही काढली गेली. मधमाश्यांचा अधिवास अतिशय कमी राहिला. पेस्टिसाईड्सच्या फवारण्यांमुळे व क्रूर पद्धतीने मध काढल्यामुळे असंख्य मधमाश्या मेल्या व त्यांच्या वसाहती नष्ट झाल्या.

या शतकाच्या सुरुवातीला शेवगा हे बांधावरील झाड शेतात आलं. अलीकडे त्याची मोठ्या प्रमाणावर लागवड झाली. त्याचप्रमाणे डाळिंब हे सोलापूर व नाशिक (उत्तर भाग) जिल्ह्यातील पीक राज्याच्या अनेक भागात पोहोचलं. ही दोन्हीही पिके परपरागीभवन होणारी आहेत. मधमाश्यांची संख्या अतिशय कमी झाल्यामुळे फळधारणेचा प्रश्न उभा ठाकला. २५-३० वर्षांपूर्वी डाळिंबाची परिस्थिती खूप चांगली होती. त्यावेळी मी स्वत: फळांची विरळणी केली होती. आता परागीभवनाअभावी उत्पादनावर अनिष्ट परिणाम झाला. गेल्या ३-४ वर्षांत बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्राची माहिती सर्वदूर पसरली. त्यामुळे शेतकऱ्यांकडून परागीभवन सेवेची मागणी वाढली. केंद्राने १०० वसाहती खरेदी केल्या. त्यांची व्यवस्था रावळगाव कारखान्याच्या प्रक्षेत्रावर करण्यात आली. कारण नाशिक जिल्ह्यातील या परिसरात द्राक्षांची प्रचंड लागवड आहे. या पिकावर वर्षभर फवारण्या सुरू असतात. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार या वसाहती पुरवण्यात आल्या. काही शेतकऱ्यांनी वसाहती खरेदी केल्या. मधमाश्यांच्या वसाहती ठेवल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात प्रचंड वाढ दिसून आली. काही शेतकऱ्यांच्या यशोगाथा वर्तमानपत्रांमध्ये झळकल्या. राज्यातील मधमाशीपालकांकडेही वसाहतींसाठी मागणी वाढली. काही वर्षांपूर्वी राज्यात विशेषत: सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यात सूर्यफुलाची लागवड मोठ्या प्रमाणात होत होती. परंतु पुढे मधमाश्यांची संख्या कमी झाल्यामुळे या पिकाच्या उत्पादनावर अनिष्ट परिणाम झाला. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी या पिकाकडे पाठ फिरवली. अन्नधान्याचे उत्पादन वाढले पण गळीत धान्ये व कडधान्यांच्या उत्पादनात फरक पडला नाही. सन १९८५ मध्ये ऑईल सीड मिशनची स्थापना होऊनही खाद्यतेलाच्या आयातीवर काहीच परिणाम झाला नाही. अलीकडे तर युक्रेन- रशिया यांच्या युद्धामुळे सूर्यफुलाची आयात बंद झाली. मलेशिया व इंडोनेशिया या देशांतून पामतेलाची आयात होते. हे निकृष्ट तेल भेसळीसाठी वापरण्यात येते. हे थांबवण्यासाठी देशात सूर्यफूल, मोहरी, भुईमूग, तीळ, कारळ, करडई इत्यादी गळीत धान्याच्या पिकांसाठी क्षेत्र वाढवलं पाहिजे. त्यासाठी मधमाशीच्या वसाहती वाढवण्याची आवश्यकता आहे.

### मान्यवरांच्या सहभागाचा मधुक्रांती परिसंवाद

सन २०१९ पासून या केंद्रात राज्यस्तरीय परिसंवाद आयोजित केला जातो. डिसेंबर महिन्यात या परिसंवादाचे नियोजन केले जाते. सन २०२० मध्ये कोरोनामुळे हा परिसंवाद ऑनलाईन घेण्यात आला होता. परिसंवादात माहिती देण्यासाठी मधमाशीवर काम करणाऱ्या तज्ज्ञांना बोलावण्यात येते. त्यावेळी राज्यातील काही मधमाशी पालक व या क्षेत्रात काम करणाऱ्या शास्त्रज्ञांचा सत्कार करण्यात येतो. परिसंवादाला राज्यभरातून १०० पेक्षा अधिक स्त्री-पुरुष उपस्थित असतात.

### विविध क्षेत्रांमधील लोकांच्या भेटी आणि सहली

या केंद्राला अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनी भेट दिली आहे. राज्याचे तत्कालीन कृषिमंत्री श्री. दादा भुसे यांनी स्वत:हून भेट दिली होती. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू, कुलसचिव, संशोधन संचालक, अधिष्ठाता, विभाग प्रमुख (कीटकशास्त्र) व प्राध्यापक यांनी भेटी दिल्या आहेत. अनेक शाळा व महाविद्यालये यांच्या सहली या प्रकल्पाला भेट देत असतात. इतर नागरिकही येथे कायम गर्दी करतात. विशेषत: शनिवार- रविवार हे दोन दिवस येथे लोकांची मोठी गर्दी होते.

### प्रात्यक्षिकांसह नियमित प्रशिक्षण सुविधा

या केंद्रामध्ये एक दिवसाचे, तीन दिवसांचे व पाच दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते. कोरोना काळात अनेक ऑनलाईन प्रशिक्षणवर्ग घेण्यात आले. आजपर्यंत अनेक स्त्री-पुरुषांनी येथे प्रशिक्षण घेतले आहे. डॉ. भास्कर गायकवाड, डॉ. बी.बी. पवार, श्री. संजय पवार, श्री. नितीन कराळे, श्री. सचिन उगले (मधमाशी पालक) व श्री. गौरव पवार हे प्रशिक्षण देतात. या प्रशिक्षणामध्ये जास्त भर प्रात्यक्षिकांवर दिला जातो. प्रत्येक प्रशिक्षणार्थीकडून मधमाश्यांची हाताळणी करून घेतली जाते, जेणेकरून त्याला स्वत:च्या वसाहतींची काळजी घेणे शक्य होईल.

बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी, कर्मचारी व मजूर मधमाश्यांची काळजी घेत आहेत. या मधमाश्यांनीच केंद्राला जागतिक स्तरावरचा पुरस्कार मिळवून दिला आहे. ■